# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०–२५६०११८९
२५६०११९०
टेलीग्राफ : 'युनिपुना'
टेलेक्स : १४५ ७७१९ युनीप इन
फॅक्स नं. : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ernet.in

गणेशखिंड,पुणे ४११००७

आरक्षण कक्ष
संदर्भ क्र. आरक्षण/ओ २२/९४१
दिनांक – ९/८/२०११

प्रति,
मा.विभाग प्रमुख
सर्व शैक्षणिक विभाग. पुणे विद्यापीठ,पुणे

मा. प्राचार्य/मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय – शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी आजी–माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी जागा राखीव ठेवणेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शैक्षणिक प्रवेशामध्ये आजी–माजी सैनिकांच्या पाल्यांना महाविद्यालयामधील प्रवेशासाठी आरक्षित ठेवावयाच्या जागेबाबत शासनाने विहित केलेले शासन परिपत्रक क्र.माजिसै–२००६/(२४१/०६)/मशि–६, दि. १० सप्टेंबर २००७ ची प्रत सोबत जोडत आहे. शैक्षणिक प्रवेशामध्ये ठेवावयाच्या आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले शासन आदेश सर्व शैक्षणिक विभाग/सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्थांना यापूर्वीच पाठविण्यात आलेले आहेत.

तरी शासनाने प्रवेशासंदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबत – वरीलप्रमाणे

९/८/२०११.
सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

**शैक्षणिक आरक्षण - माजी सैनिक कल्याण**
अभियांत्रिकी महाविद्यालये, टेक्नीकल, टेक्नॉलॉजीकल,
पॉलीटेक्नीक, कला, वाणिज्य , अध्यापक महाविद्यालये

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र. माजीसै- २००६/ (२४१ /०६) /मशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक: १० सप्टेंबर, २००७

संदर्भ- १) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. टीसीएम-
१८८४/(१८५/८४)/माशि-४, दि. २८ जून, १९८४.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. आयटीआय-
१००२/प्र.क्र. ५१/व्यशि-२, दि. ३० एप्रिल, २००२
३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. बीईसी -
२१९२/(५०३३)(१)/तांशि-१, दि. २८ एप्रिल, १९९२

परीपत्रक- आजी /माजी सैनिकांच्या मुलांना शाळा / कॉलेज यामधील प्रवेशासाठी, अभियांत्रिकी महाविद्यालय/ टेक्निकल / टेक्नॉलॉजीकल व पॉलीटेक्नीक शिक्षणासाठी प्रवेशासाठी ५ % जागा तसेच अध्यापक महाविद्यालयांच्या एकूण प्रवेश क्षमतेपैकी ५ % जागा तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधुन १ % जागा किंवा जास्तीत जास्त १० जागा आरक्षित केलेल्या आहेत. असे असले तरी सदरहू नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे, राज्यातील माजी सैनिकांच्या कल्याणार्थ उपाययोजना करण्याच्या संदर्भात नेमलेल्या तदर्थ समितीने, अहवालान्वये शासनाच्या निदर्शनास आणलेले आहे. सदर अहवाल विधानपरीषदेस दि. २०.४.२००६ रोजी सादर करण्यात आला आहे.

२. सदर अहवालाच्या अनुषगांने पुन्हा एकदा निदर्शनास आणण्यात येते की, राज्यातील आजी/ माजी सैनिकांच्या कल्याणार्थ शासन विविध योजना राबवित असते. त्याद्वारे माजी सैनिक/ युध्दविधवा/ माजी सैनिकांच्या विधवा/ माजी सैनिकांचे अवलंबित यांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी शासन कटिबध्द आहे. त्यामुळे आजी/ माजी सैनिकांच्या मुलांना शाळा / कॉलेज यामधील प्रवेशासाठी शासनाने विहीत केल्यानुसार जागा राखीव ठेवण्यात येवून त्या फक्त संबंधित उमेदवारांमधूनच भरण्यात याव्यात. सदर जागा इतर प्रवर्गातून भरल्या जाऊ नयेत. जे संस्थाचालक आदेशाची अंमलबजावणी करीत नाहीत त्यांचेवर कडक कारवाई करण्यात यावी. प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रीयेवेळी संबंधित जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, माजी/आजी सैनिकांच्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रवेशाचा आढावा घेतील त्यावेळी त्यांना सर्वतोपरी सहाय्य करण्याच्या सुचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात.

हे शासन परीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. 20070910114946001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(स्वाक्षरी)
**( वि. स. भोसले)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

संचालक, व्यवसाय शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य , मुंबई.
संचालक, प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य , मुंबई.
संचालक, कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई ,
संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ,
सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण विभागीय कार्यालय,
कुलसचिव , अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई ,
सहसंचालक, लेखा व कोषागारे, मुंबई ,
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व कार्यासने / सामान्य प्रशासन विभाग कार्या. २८
निवडनस्ती/ मशि-६